महाराष्ट्र राज्य गुजराथी साहित्य अकादमीची रचना.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. गुसाअ-१०९४/प्र.क्र.५०७/९६/सां.का. ४.
जुने जकात घर, डी.डी. इमारत, २ रा. मजला,
शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०० ०२३.
दिनांक :- ३० ऑगस्ट, १९९६

शासन निर्णय :- हिंदी, सिंधी आणि उर्दू भाषा व साहित्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्यात शासनाने अनुक्रमे महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, सिंधी अकादमी व उर्दू अकादमीची स्थापना केली आहे. त्याचे प्रमाणे राज्यात गुजराथी साहित्य अकादमी स्थापन करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाच्या या निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य गुजराथी साहित्य अकादमीची रचना करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या अकादमीवर पुढील प्रमाणे पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. श्री. चंदुलाल सेलारका, मुंबई | अध्यक्ष |
| २. श्री. अनिल जोशी, मुंबई | उपाध्यक्ष |
| ३. श्री. निरंजन महेता, मुंबई | सदस्य सचिव |
| ४. श्री. दिनकर जोशी, मुंबई | सदस्य |
| ५. श्री. सुरेश दलाल, मुंबई | सदस्य |
| ६. श्री. मुकुंद महेता, मुंबई | सदस्य |
| ७. श्री. चंद्रकांत बक्षी, मुंबई | सदस्य |
| ८. श्रीमती गीता माणिक, ठाणे | सदस्या |
| ९. श्री. हरिभाई कोठारी, मुंबई | सदस्य |
| १०. श्री. सर्वेश वोरा, मुंबई | सदस्य |
| ११. श्री. लाल राभीया, | सदस्य |
| १२. श्री. मेहुल सुरेन ठाकर | सदस्य |
| १३. ॲड. नेमचंद गाला, मुंबई | सदस्य |
| १४. श्रीमती. सरिता जोशी | सदस्या |
| १५. श्री. मनहर उदास | सदस्य |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १६. | श्रीमती. वर्षा अडालजा | सदस्या |
| १७. | श्री. किर्तीदा महेता | सदस्य |
| १८. | श्री. मनुभाई उमाशंकर जोशी | सदस्य |
| १९. | श्री. गुणवंत भट्ट | सदस्य |
| २०. | श्री. जयंत पारेख | सदस्य |
| २१. | श्री. उत्तम गडा | सदस्य |
| २२. | श्रीमती. सोनल शुक्ल | सदस्या |
| २३. | श्रीमती. पन्ना अध्वर्यू | सदस्या |
| २४. | श्रीमती. डॉ. माला कापडीया | सदस्या |
| २५. | श्री. ब्रजेन देसाई, नाशिक | सदस्य |
| २६. | श्री. कांतीलाल पारीख, पुणे | सदस्य |
| २७. | श्री. प्रतापराय पांधी, नागपूर | सदस्य |
| २८. | श्री. हेमल रवानी, कल्याण ठाणे | सदस्य |
| २९. | कु. दक्षाबेन देगडा, मुंबई | सदस्या |

२. या अकादमीचा कालावधी नवीन पुनर्रचना होई पर्यंत राहील. अकादमीचे मुख्यालय मुंबई येथे राहील. अकादमीची कार्ये व उद्दिष्टे पुढील प्रमाणे राहतील:

१. राज्यातील गुजराथी भाषेच्या सर्वांगिण विकासास प्रोत्साहन देणे.
२. राज्यभाषा मराठी व गुजराथी या भाषेमध्ये भाषांतराद्वारे वा अन्य साहित्यिक प्रयत्नाने सृजनशील कल्पनांची देवाण-घेवाण करणे.
३. गुजराथी भाषेच्या अधिक उन्नतिसाठी विविध योजना कार्यान्वित करणे.
४. गुजराथी भाषेमध्ये संशोधन निबंध, प्रबंधिका, पुस्तके आणि नियतकालिके, प्रकाशित करणे किंवा अशा कार्यास सहाय्य करणे.
५. महाराष्ट्रात वास्तव्य असलेले गुजराथी लेखक व कवींच्या, अकादमीने मान्य केलेल्या वाड:मयीन कृती प्रसिध्द करण्यास, आर्थिक मदत करणे.
६. गुजराथी साहित्यिक संस्था व वाड:मयीन कार्यांना आर्थिक सहाय्य करणे.
७. राज्यात गुजराथी भाषेला उत्तेजन देण्यासाठी चर्चासत्रे, संमेलने, परिसंवाद प्रदर्शने आयोजित करणे किंवा अशा उपक्रमांना आर्थिक सहाय्य करणे.
८. ग्रंथालये व सार्वजनिक वाचनालये यांना गुजराथी पुस्तके व नियम-कालिके पुरविणे.

Scanned by CamScanner

९. महाराष्ट्रात वास्तव्य असलेल्या लेखक कवींच्या गुजराथी साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट कलाकृतींना पुरस्कार देणे.

१०. राज्यात स्थायीक असलेल्या राज्यातील गुजराथी विद्वान किंवा विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती किंवा शिष्यवृत्ती देणे.

११. राज्यात शासनाने मान्यता दिलेल्या मार्गाद्वारे जनतेकडून देणग्या घेणे किंवा निधी उभा करणे व त्याचा उपयोग अकादमीच्या विविध कार्यांप्रित्यर्थ करणे.

१२. राज्य शासनास मंडळाच्या कार्यक्रमाची वेळोवेळी माहिती देणे.

१३. राज्यातील गुजराथी भाषेच्या विकासासाठी धोरण ठरविण्याच्या बाबतीत व गुजराथी भाषेच्या विकासासाठी विविध प्रकल्प हाती घेण्याच्या संबंधात राज्य शासनास सल्ला देणे.

२. [illegible]

३. वित्त विभाग शासन निर्णय [१] क्र. टीआरए-१४७७/१०३२/सी/एसईआर-५ दिनांक २३.९.१९७७ च्यासंदर्भात मुंबई नागरी सेवा नियमावली खंड -२ मधील जोडपत्र एक्सएल-२-ए मध्ये ठरविलेल्या दर्जानुसार मिळण्याजोगा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मिळण्यास वरील अकादमीचे सदस्य पात्र असतील. तसेच [२] परिपत्रक क्र. १४८८/प्र. क्र. ८५/सेवा-५ दिनांक १४.२.१९८८ अन्वये अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मुंबई नागरी सेवा\ नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२ [अे] यातील सेक्शन १ मधील १ [१][बी] च्या तरतुदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१४७७/१०३२/एसईआर-५ दिनांक २४.९.१९७७ व क्र. टीआरए-१०८३/१४२६/एसईआर-५ दि. १.२.१९८४ च्याआधारे नियमित केला जावा. या नियमाच्या तरतुदी केवळ रेल्वे / सडक प्रवासासाठी लागूअसल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार प्रथम श्रेणीच्या शासकीय अधिकाऱ्यांना विमान प्रवास करण्यावर बंदी असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकूलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

४. मंडळाच्या सदस्यांच्या प्रवास भत्त्याच्या बिलांवर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार आहरण व संवितरण अधिकारी, अवर सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग [उर्दू, हिंदी व सिंधी अकादमी] यांना देण्यात येत आहेत.

याबाबत होणारा खर्च कोणत्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा, याबाबतचे आदेश वेगळ्याने काढण्यात येतील.

Scanned by CamScanner

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.६२०/व्यय-११, दिनांक ३१.८.१९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-

[ प्र.ता.गौड ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्री यांचे सचिव

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

निवासी लेखाधिकारी, मुंबई

वित्त विभाग/व्यय-११, एसईआर-५,

सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई

मंत्रालयीन सर्व विभाग,

सर्व कार्यासनअधिकारी, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य वक्रीडा विभाग.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई

[ प्रसिध्द पत्र निर्गमित करण्याच्या विनंतीसह ]

महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीचे सर्व सदस्य ]

निवड नस्ती/सां.का.४

Scanned by CamScanner